# व्यवसायाच्या माध्यमातूनही करिअर

## -नवनाथ गोरे यांचे मत

कुंडल : वार्ताहर

व्यवसायाच्या माध्यमातूनही करिअर होऊ शकते; फक्त तो आत्मविश्वासाने केला पाहिजे, असे मत प्रसिद्ध कादंबरीकार नवनाथ गोरे यांनी व्यक्त केले.

कुंडलयेथीलक्रांतिअग्रणीजी. डी. बापू लाड महाविद्यालयाच्या वतीने आयोजित सत्कार समरंभप्रसंगी ते बोलत होते. क्रांती दूध संघाचे चेअरमन किरण लाड यांच्या हस्ते नवनाथ गोरे यांना त्यांच्या 'फेसाटी या कादंबरीसाठी साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी सचिव शहाजी लाड, प्राचार्य डॉ. के. एम. नलावडे, ज्येष्ठ प्रा. डॉ. प्रताप लाड, जे. ए. पाटील उपस्थित होते.




कुंडल येथील क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयाच्यावतीने 'फेसाटी'कार नवनाथ गोरे यांना साहित्य अकादमीचा युवा साहित्यिक पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार समारंभ प्रसंगी बोलताना नवनाथ गोरे. यावेळी किरण लाड, प्राचार्य डॉ. के.एम. नलावडे, सचिव शहाजी लाड, डॉ. प्रताप लाड आदी.

गोरे पुढे म्हणाले, युवा पिढीने आपला आत्मविश्वास वाढविला पाहिजे, तरच जीवनात यशस्वी व्हाल, नोकरी असो वा व्यवसाय; त्याकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन हवा. याकरिता स्वतः बद्दल स्वतःलाच प्रश्न विचारावा सकारात्मक उत्तर मिळेल. ग्रामीण भागातही खूप बुद्धिमत्ता आहे. यशस्वी होण्यासाठी आपल्या परिस्थितीची जाण असली पाहिजे व सर्वांत महत्त्वाचे आपली बोलीभाषाच प्रभावी ठरते. याकरिता ती प्रभावशाली असणे गरजेचे असून स्वतःबद्दल बोलताना त्यांनी डॉ. रणधीर शिंदे हेच आपल्या यशाचे शिल्पकार असल्याचे सांगितले.

किरण लाड म्हणाले की ग. दि. माडगुळकरांसारख्या प्रतिभावंत व्यक्तीचे जीवन कुंडलमध्ये घडले. अशा गावामध्ये अनेक विद्यार्थी घडत आहेत. नवनाथ गोरेंनी जे अनुभवले ते लिहिले. प्राचार्य डॉ. के. एम. नलावडे यांनीही मनोगत व्यक्त केले. स्वागत डॉ. डी. एम. होनमाने यांनी केले. प्रा. एन. के. गुंड यांनी प्रास्ताविक करून आभार मानले.

यावेळी प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होत्या.

# आत्मविश्वासाने व्यवसायातही करिअर :गोरे




कुंडल : लेखक आपल्या भेटीला कार्यक्रमात बोलताना नवनाथ गोरे बाजूस अन्य.

**कुंडल:** व्यवसायाच्या माध्यमातूनही करीअर होऊ शकते फक्त तो आत्मविश्वासाने केला पाहिजे, असे मत प्रसिद्ध कादंबरीकार नवनाथ गोरे यांनी व्यक्त केले. ते कुंडल येथील क्रांतिअग्रणी जी.डी. बापू लाड महाविद्यालयाच्या वतीने आयोजित सत्कार समारंभ प्रसंगी बोलत होते.

किरण(तात्या) लाड यांच्या हस्ते नवनाथ गोरे यांना त्यांच्या फेसाटी या कादंबरीसाठी साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळालेबद्दल महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी सचिव शहाजी लाड, प्राचार्य के. एम.नलावडे, प्रताप लाड, जे. ए. पाटील, आदी मान्यवर उपस्थित होते.

गोरे पुढे म्हणाले की, युवा पिढीने आपला आत्मविश्वास वाढविला पाहिजे. तरच जीवनात यशस्वी व्हाल, नोकरी, असो वा व्यवसाय त्याकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टीकोन हवा, याकरिता स्वत:बद्दल स्वत:लाच प्रश्न विचारावा. सकारात्मक उत्तर मिळेल, ग्रामिण भागातही खुप बुद्धीमत्ता आहे. यशस्वी होण्यासाठी आपल्या परीस्थितीची जाण असली पाहिजे, व सर्वात महत्वाचे आपली बोलीभाषाच प्रभावी ठरते.

किरण लाड म्हणाले की, ग. दि. माडगुळकरांसारख्या प्रतिभावंत व्यक्तीचे जीवन कुंडलमध्ये घडले. अशा गावामध्ये अनेक विद्यार्थी घडत आहेत, नवनाथ गोरेंनी जे अनुभवले ते लीहले. प्राचार्य, डॉ. के. एम. नलावडे यांनीही मनोगत व्यक्त केले. स्वागत डॉ. डी. एम. होनमाने यांनी तर प्रा. एन. के. गुंड यांनी प्रास्ताविक व आभार मानले.

दै. तरुण भारत ता- ०६/०८/२०१८